श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

ऋषभ गीता पञ्चमोऽध्यायः (भा॰म॰5.5)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
पञ्चम स्कन्धः
॥ पञ्चमोऽध्यायः ॥

ऋषभ उवाच

नायं(न्) देहो देहभाजां(न्) नृलोके,
कष्टान् कामानर्हते विड्भुजां(यँ) ये ।
तपो दिव्यं(म्) पुत्रका येन सत्त्वं(म्),
शुद्ध्येद्यस्माद् ब्रह्मसौख्यं(न्) त्वनन्तम् ॥ 1॥

श्रीऋषभदेव म्हणाले – पुत्रांनो, हे मनुष्यशरीर या मर्त्य लोकात दुःखमय विषयभोग प्राप्त करण्यासाठी नाही. हे भोग तर विष्ठा भक्षण करणाऱ्या डुक्कर-कुत्री इत्यादींनाही मिळतात. या शरीराने ज्यामुळे अंतःकरण शुद्ध होईल, असे दिव्य तपच केले पाहिजे, कारण त्यामुळेच अनंत ब्रह्मानंदाची प्राप्ती होते.

महत्सेवां(न्) द्वारमाहुर्विमुक्ते-

स्तमोद्वारं(यँ) योषितां(म्) सङ्गिसङ्गम् ।

महान्तस्ते समचित्ताः(फ्) प्रशान्ता,

विमन्यवः(स्) सुहृदः(स्) साधवो ये ॥ 2॥

शास्त्रांनी महापुरुषांच्या सेवेला मुक्तीचे तर स्त्रीसक्त कामी लोकांच्या सहवासाला नरकाचे द्वार म्हटले आहे. समचित्त, परमशांत, क्रोधहीन, सर्वांचे हितचिंतक आणि सदाचारसंपन्न जे आहेत, त्यांनाच महापुरुष म्हटले जाते.

ये वा मयीशे कृतसौहृदार्था,

जनेषु देहम्भरवार्तिकेषु ।

गृहेषु जायात्मजरातिमत्सु,

न प्रीतियुक्ता यावदर्थाश्च लोके ॥ 3॥

किंवा मज परमात्म्यावर प्रेम करणे हाच एकमेव पुरुषार्थ मानणारे, केवळ विषयांचीच चर्चा करणाऱ्या लोकांविषयी तसेच स्त्री, पुत्र, धन इत्यादी सामग्रीनी संपन्न घरांविषयी ज्यांना अनास्था आहे आणि जे लौकिक कार्यामध्ये केवळ शरीरनिर्वाहापुरतेच प्रवृत्त होतात, तेच महापुरुष होत.

नूनं(म्) प्रमत्तः(ख्) कुरुते विकर्म,

यदिन्द्रियप्रीतय आपृणोति ।

न साधु मन्ये यत आत्मनोऽय-

मसन्नपि क्लेशद आस देहः ॥ 4॥

मनुष्य निश्चितच भ्रमावश होऊन कुकर्म करू लागतो. इंद्रियांना तृप्त करण्यासाठीच त्याची अशी प्रवृत्ती होते. मी हे योग्य समजत नाही. कारण यामुळेच आत्म्याला हे नाशवंत आणि दुःखदायक शरीर प्राप्त होते.

पराभवस्तावदबोधजातो,

यावन्न जिज्ञासत आत्मतत्त्वम् ।

यावत्क्रियास्तावदिदं(म्) मनो वै,

कर्मात्मकं(यँ) येन शरीरबन्धः ॥ 5॥

जोपर्यंत जीवाला आत्मतत्त्वाबद्दल जिज्ञासा निर्माण होत नाही, तोपर्यंत अज्ञानाने देहादिकांमुळे त्याचे स्वरूप लपलेले असते. जोपर्यंत हा लौकिक-वैदिक कर्मांमध्ये गुंतलेला असतो, तोपर्यंत मनामध्ये कर्मांच्या वासना शिल्लक असतात आणि त्यामुळेच देहबंधन प्राप्त होते.

एवं(म्) मनः(ख्) कर्मवशं(म्) प्रयुङ्क्ते,

अविद्ययाऽऽत्मन्युपधीयमाने ।

प्रीतिर्न यावन्मयि वासुदेवे,

न मुच्यते देहयोगेन तावत् ॥ 6॥

अशा प्रकारे अविद्येने आत्मस्वरूप झाकले गेले असल्याने कर्मवासनांच्या अधीन असलेले चित्त मनुष्याला पुन्हा कर्मांमध्येच प्रवृत्त करते. म्हणून जोपर्यंत मज वासुदेवात प्रीती निर्माण होत नाही, तोपर्यंत तो देहबंधनातून सुटू शकत नाही.

यदा न पश्यत्ययथा गुणेहां(म्),

स्वार्थे प्रमत्तः(स्) सहसा विपश्चित् ।

गतस्मृतिर्विन्दति तत्र तापा-

नासाद्य मैथुन्यमगारमज्ञः ॥ 7॥

स्वार्थामुळे वेढा झालेला जीव आपल्या विषयांच्या आश्रयाने इंद्रियांचे चोचले पुरविणे हे कार्य आहे, असे समजत नाही. तोपर्यंत आत्मस्वरूपाचे विस्मरण झाल्यामुळे तो अज्ञानामुळे विषयप्रधान असे घर इत्यादींमध्ये आसक्त होऊन राहतो आणि निरनिराळे क्लेश सहन करतो.

पुं(म्)सः(स्) स्त्रिया मिथुनीभावमेतं(न्),

तयोर्मिथो हृदयग्रन्थिमाहुः ।

अतो गृहक्षेत्रसुताप्तवित्तै-

र्जनस्य मोहोऽयमहं(म्) ममेति ॥ 8॥

स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये जो परस्परांमध्ये पतिपत्नीभाव आहे, त्यालाच ज्ञानी लोक हृदयाचे अज्ञानबंधन समजतात. त्यामुळेच जीवाला घर, शेत, पुत्र, स्वजन आणि धन इत्यादींमध्ये सुद्धा 'मी' आणि 'माझे' पणाचा मोह उत्पन्न होतो.

यदा मनोहृदयग्रन्थिरस्य,

कर्मानुबद्धो दृढ आश्लथेत ।

तदा जनः(स्) सम्परिवर्ततेऽस्मान्-

मुक्तः(फ्) परं(यँ) यात्यतिहाय हेतुम् ॥ 9॥

कर्मवासनेमुळे घट्ट झालेली ही हृदय-ग्रंथी (गाठ) सैल होते, त्यावेळी हा पुरुष दांपत्यभावातून निवृत्त होतो आणि संसाराला कारण असणाऱ्या अहंकाराचा त्याग करून सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्त होऊन परमपदाची प्राप्ती करून घेतो.

हं(म्)से गुरौ मयि भक्त्यानुवृत्या,

वितृष्णया द्वन्द्वतितिक्षया च ।

सर्वत्र जन्तोर्व्यसनावगत्या,

जिज्ञासया तपसेहानिवृत्त्या ॥ 10॥

मत्कर्मभिर्मत्कथया च नित्यं(म्),

मद्देवसङ्गाद् गुणकीर्तनान्मे ।

निर्वैरसाम्योपशमेन पुत्रा,

जिहासया देहगेहात्मबुद्धेः ॥ 11॥

अध्यात्मयोगेन विविक्तसेवया,

प्राणेन्द्रियात्माभिजयेन सध्यक् ।

सच्छ्रद्धया ब्रह्मचर्येण शश्वद्

असम्प्रमादेन यमेन वाचाम् ॥ 12॥

सर्वत्र मद्भावविचक्षणेन,

ज्ञानेन विज्ञानविराजितेन ।

योगेन धृत्युद्यमसत्त्वयुक्तो,

लिङ्गं(वँ) व्यपोहेत्कुशलोऽहमाख्यम् ॥ 13॥

पुत्रांनो, संसारसागरातून पार होण्यासाठी कुशल, धैर्यवान, उद्योगी अशा सत्त्वगुणविशिष्ट माणसाने सर्वांचा आत्मा आणि गुरुस्वरूप अशा माझ्यात भक्तिभाव ठेवून मला शरण यावे. तसेच आसक्तीचा त्याग करावा. सुख-दुःखादी द्वंद्वे सहन करावीत. जीवाला सर्व योनींमध्ये दुःख भोगावेच लागते, असा विचार करावा.तत्त्वजिज्ञासेने, तपाने, सकाम कर्मांचा त्याग करून माझ्यासाठीच कर्म करावीत. माझ्या कथा नेहमी श्रवण करून माझ्या भक्तांशी सहवास ठेवून माझ्या गुणांचे कीर्तन करावे. कोणाशीही वैर न करता समतेने व शांततेने वागावे. शरीर, घर इत्यादींबाबतीत मी-माझेपणाच्या भावनेचा त्याग करण्याची इच्छा धरावी.अध्यात्मशास्त्राच्या अनुशीलनाने, एकांतात वास करून प्राण, इंद्रिये, मन यांना ताब्यात ठेवून शास्त्र आणि सत्पुरुषांच्या वचनांवर श्रद्धा ठेवावी. पूर्ण ब्रह्मचर्य पाळून कर्तव्यकर्मामध्ये नेहमी तत्पर असावे. वाणीवर संयम ठेवावा. सगळीकडे माझीच सत्ता आहे असे जाणून अनुभवज्ञानासहित तत्त्वविचार आणि योगसाधन करून अहंकाररूप आपल्या लिंगशरीराला माझ्यात लीन करावे

कर्माशयं(म्) हृदयग्रन्थिबन्ध-

मविद्ययाऽऽसादितमप्रमत्तः ।

अनेन योगेन यथोपदेशं(म्),

सम्यग्व्यपोह्योपरमेत योगात् ॥ 14॥

मनुष्याने दक्ष राहून अविद्येमुळे उत्पन्न झालेल्या या हृदयग्रंथिरूप बंधनाला शास्त्रोक्त रीतीने वरील साधनांनी पूर्णपणे तोडून टाकावे. कारण कर्मसंस्कार राहण्याचे मन हेच ठिकाण आहे. त्यानंतर साधनांचाही त्याग करावा.

पुत्रां(म्)श्च शिष्यां(म्)श्च नृपो गुरुर्वा
मल्लोककामो मदनुग्रहार्थः ।
इत्थं(वँ) विमन्युरनुशिष्यादतज्ज्ञान्
न योजयेत्कर्मसु कर्ममूढान् ।
कं(यँ) योजयन्मनुजोऽर्थं(लँ) लभेत
निपातयन्नष्टदृशं(म्) हि गर्ते ॥ 15॥

ज्याला माझ्या लोकांची प्राप्ती किंवा माझा अनुग्रह हवा असेल, त्या राजाने प्रजेला, गुरूने शिष्यांना आणि पित्याने पुत्रांना असाच उपदेश करावा. जर ते अज्ञानामुळे अशा उपदेशानुसार न वागता काम्य कर्म हाच परम पुरुषार्थ मानित राहिले, तरीसुद्धा त्यांच्यावर क्रोध न करता त्यांना समजावून सांगून काम्यकर्मामध्ये प्रवृत्त होऊ देऊ नये. जसे एखाद्या अंधळ्या माणसाला जाणून-बुजून खड्ड्यात ढकलावे, त्याप्रमाणे हे होईल. यामुळे कोणता पुरुषार्थ साध्य होईल बरे?

लोकः(स्) स्वयं(म्) श्रेयसि नष्टदृष्टि-
र्योऽर्थान् समीहेत निकामकामः ।
अन्योन्यवैरः(स्) सुखलेशहेतो-
रनन्तदुःखं(ञ्) च न वेद मूढः ॥ 16॥

आपले खरे कल्याण कशात आहे, ते लोकांना समजत नाही. म्हणूनच ते निरनिराळ्या कामनामध्ये अडकून तुच्छ क्षणिक सुखासाठी आपापसात वैर बाळगतात. यामुळे अनंत दुःखांची प्राप्ती होते, या गोष्टीचा हे मूर्ख कधीच विचार करीत नाहीत.

कस्तं(म्) स्वयं(न्) तदभिज्ञो विपश्चिद्
अविद्यायामन्तरे वर्तमानम् ।
दृष्ट्वा पुनस्तं(म्) सघृणः(ख्) कुबुद्धिं(म्),
प्रयोजयेदुत्पथगं(यँ) यथान्धम् ॥ 17॥

जसे डोळस मनुष्य अयोग्य वाटेने जाणाऱ्या अंधळ्याला तिकडे जाऊ देत नाही, त्याचप्रमाणे अज्ञानी माणूस अविद्येमुळे दुःखाकडे जात असलेला पाहून कोणता दयाळू आणि ज्ञानी पुरुष जाणून-बुजून त्याला त्या दिशेने जाऊ देईल?

गुरुर्न सं स्यात्स्वजनो न स स्यात् ,
पिता न सं स्याज्जननी न सा स्यात् ।
दैवं(न्) न तत्स्यान्न पतिश्च सं स्यान्-
न मोचयेद्यः(स्) समुपेतमृत्युम् ॥ 18॥

जो मनुष्याला भागवद्भक्तीचा उपदेश करून जन्म-मृत्यूच्या फासातून सोडवीत नाही, तो गुरु गुरु नव्हे, स्वजन स्वजन नव्हे, पिता पिता नव्हे, माता माता नव्हे, देव देव नव्हे आणि पती पती नव्हे.

इदं(म्) शरीरं(म्) मम दुर्विभाव्यं(म्),
सत्त्वं(म) हि मे हृदयं(यँ) यत्र धर्मः ।
पृष्ठे कृतो मे यदधर्म आराद्
अतो हि मामृषभं(म्) प्राहुरार्याः ॥ 19॥

माझ्या या अवतार-शरीराचे रहस्य जाणणे सामान्य लोकांच्या बुद्धीच्या पलीकडचे आहे. शुद्ध सत्त्व हेच माझे हृदय आहे आणि त्यात धर्माचेच अधिष्ठान आहे. अधर्माला मी फार मागे ढकलले आहे, म्हणूनच सत्पुरुष मला "ऋषभ" असे म्हणतात.

तस्माद्भवन्तो हृदयेन जाताः(स्),
सर्वे महीयां(म्)सममुं(म्) सनाभम् ।
अक्लिष्टबुद्ध्या भरतं(म्) भजध्वं(म्),
शुश्रूषणं(न्) तद्भरणं(म्) प्रजानाम् ॥ 20॥

तुम्ही सर्वजण माझ्या त्या शुद्ध सत्त्वमय हृदयापासून उत्पन्न झालेले आहात, म्हणून मत्सराचा त्याग करून आपला मोठा भाऊ भरत याची सेवा करा. त्याची सेवा करणे म्हणजेच माझी सेवा करणे होय आणि हेच तुमचे प्रजापालन करणे होय.

भूतेषु वीरुद्भ्य उदुत्तमा ये,
सरीसृपास्तेषु सबोधनिष्ठाः ।
ततो मनुष्याः(फ्) प्रमथास्ततोऽपि,
गन्धर्वसिद्धा विबुधानुगा ये ॥ 21॥

सर्व स्थावर वस्तूंमध्ये वृक्ष श्रेष्ठ आहेत, त्यांच्यापेक्षा . चालणारे.. जीव श्रेष्ठ होत . त्यातसुद्धा कीटक इत्यादींपेक्षा ज्ञानयुक्त पशू इत्यादी श्रेष्ठ आहेत. पशूंपेक्षा मनुष्य, मनुष्यांपेक्षा प्रमथगण, प्रमथांपेक्षा गंधर्व, गंधर्वांपेक्षा सिद्ध आणि सिद्धांपेक्षा देवतांचे अनुयायी किन्नरादी श्रेष्ठ आहेत.

देवासुरेभ्यो मघवत्प्रधाना,
दक्षादयो ब्रह्मसुतास्तु तेषाम् ।
भवः(फ्) परः(स्) सोऽथ विरिञ्चवीर्यः(स्),
स मत्परोऽहं(न्) द्विजदेवदेवः ॥ 22॥

त्यांच्यापेक्षा असुर, असुरांपेक्षा देव आणि देवांपेक्षाही इंद्र श्रेष्ठ आहे. इंद्रापेक्षाही ब्रह्मदेवाचे पुत्र दक्ष इत्यादी प्रजापती श्रेष्ठ आहेत. ब्रह्मदेवाच्या पुत्रांमध्ये रुद्र सर्वश्रेष्ठ आहेत. ते ब्रह्मदेवापासून उत्पन्न झाले आहेत, म्हणून

ब्रह्मदेव त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. तसेच माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत आणि माझी उपासना करतात, म्हणून मी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु ब्राह्मण (तर) माझ्यापेक्षाही श्रेष्ठ आहेत, कारण मी त्यांना पूज्य मानतो.

न ब्राह्मणैस्तुलये भूतमन्यत्-

पश्यामि विप्राः(ख्) किमतः(फ्) परं(न्) तु ।

यस्मिन्नृभिः(फ्) प्रहुतं(म्) श्रद्धयाह-

मश्नामि कामं(न्) न तथाग्निहोत्रे ॥ 23॥

हे विप्रांनो, दुसऱ्या कोणत्याही प्राण्याला मी ब्राह्मणांच्या बरोबरीने सुद्धा समजत नाही. तर त्यांच्यापेक्षा अधिक कोण मानू शकेन? लोक श्रद्धापूर्वक ब्राह्मणांच्या मुखामध्ये जे अन्न इत्यादी घालतात, ते जसे मी प्रसन्नतेने ग्रहण करतो, तसा अग्निहोत्रात हवन केलेल्या द्रव्याचा मी स्वीकार करीत नाही.

धृता तनूरुशती मे पुराणी,

येनेह सत्त्वं(म्) परमं(म्) पवित्रम् ।

शमो दमः(स्) सत्यमनुग्रहश्च,

तपस्तितिक्षानुभवश्च यत्र ॥ 24॥

ज्यांनी या लोकात अध्ययन इत्यादी करून माझ्या वेदरूपी अत्यंत सुंदर आणि पुरातन मूर्तीला धारण केले आहे, तसेच जे परम पवित्र (अशा) सत्गुण, शम, दम, सत्य, दया, तप, तितिक्षा आणि ज्ञान आदि आठ गुणांनी संपन्न आहेत, त्या ब्राह्मणांपेक्षा अधिक श्रेष्ठ आणखी कोण असू शकेल?

मत्तोऽप्यनन्तात्परतः(फ्) परस्मात्-

स्वर्गापवर्गाधिपतेर्न किञ्चित् ।

येषां(ङ्) किमु स्यादितरेण तेषा-

मकिञ्चनानां(म्) मयि भक्तिभाजाम् ॥ 25॥

ब्रह्मदेव इत्यादींपेक्षाही श्रेष्ठ आणि अनंत तसेच स्वर्ग-मोक्षाचा अधिपती अशा माझ्याकडून माझे निष्काम भक्त काहीही इच्छित नाहीत; तर राज्य इत्यादी अन्य वस्तूंची ते कशाला इच्छा करतील?

सर्वाणि मद्भिष्ण्यतया भवद्भि-

श्चराणि भूतानि सुता ध्रुवाणि ।

सम्भावितव्यानि पदे पदे वो,

विविक्तदृग्भिस्तदुहार्हणं(म्) मे ॥ 26॥

पुत्रांनो, तुम्ही सर्व चराचर भूतमात्रांना माझेच शरीर समजून शुद्ध बुद्धीने पदोपदी त्यांची सेवा करा, तीच माझी खरी पूजा होय.

मनोवचोदृक्करणेहितस्य,

साक्षात्कृतं(म्) मे परिबर्हणं(म्) हि ।

विना पुमान् येन महाविमोहात्,

कृतान्तपाशान्न विमोक्तुमीशेत् ॥ 27॥

मन, वचन, दृष्टी आणि अन्य इंद्रियांच्या कर्मांचे प्रत्यक्ष फळ म्हणजे माझे यथाप्रकारे पूजन करणे होय. याखेरीज मनुष्य स्वतःला महामोहमय काळपाशापासून सोडवून घेऊ शकत नाही.

श्रीशुक उवाच

एवमनुशास्यात्मजान् स्वयमनुशिष्टानपि

लोकानुशासनार्थं(म्) महानुभावः(फ्)परमसुहृद्-

भगवानृषभापदेश उपशमशीलाना-

मुपरतकर्मणां(म्) महामुनीनां(म्) भक्तिज्ञान-

वैराग्यलक्षणं(म्) पारमहं(म्)स्यधर्ममुपशिक्षमाणः(स्)

स्वतनयशतज्येष्ठं(म्) परमभागवतं(म्)

भगवज्जनपरायणं(म्) भरतं(न्) धरणिपालनाया-

भिषिच्य स्वयं(म्) भवन एवोर्वरितशरीरमात्र-

परिग्रह उन्मत्त इव गगनपरिधानः(फ्)

प्रकीर्णकेश आत्मन्यारोपिताहवनीयो ब्रह्मावर्तात्प्रव्रव्राज ॥ 28॥

श्रीशुकदेव म्हणतात - जरी ऋषभदेवांचे पुत्र स्वतः सर्व प्रकारे सुशिक्षित होते, तरी लोकांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने महाप्रभावशाली परम सुहृद, भगवान ऋषभांनी अशा प्रकारे त्यांना उपदेश केला. ऋषभदेवांच्या शंभर पुत्रांमध्ये भरत सर्वांत ज्येष्ठ होता. तो भगवंतांचा परम भक्त आणि भगवद्भक्त-परायण होता. पृथ्वीचे पालन करण्यासाठी ऋषभदेवांनी त्याला राजसिंहासनावर बसविले आणि ते स्वतः उपशमशील, निवृत्तिपरायण, महामुनींच्या भक्ती, ज्ञान आणि वैराग्यरूप परमहंसांना उचित अशा धर्माचे शिक्षण देण्यासाठी पूर्ण विरक्त झाले. फक्त शरीर हीच वस्तू जवळ ठेवली आणि घरात राहूनही सर्वांचा त्याग केला. आता तर वस्त्रांचाही त्याग करून ते सर्वथैव दिगंबर झाले. त्यावेळी त्यांचे केस विस्कटलेले होते. वेष वेड्यासारखा होता. अशा स्थितीत त्यांनी अग्निहोत्रीय अग्नींना आपल्यातच लीन करून घेतले ते संन्यासी झाले आणि ब्रह्मावर्त देशाच्या बाहेर पडले.

जडान्धमूकबधिरपिशाचोन्मादकवदवधूतवेषोऽ-

भिभाष्यमाणोऽपि जनानां(ङ्) गृहीतमौनव्रतस्तूष्णीं(म्) बभूव ॥ 29॥

त्यांनी संपूर्णपणे मौन धरले होते. लोकांनी काही विचारले तरी ते बोलत नसत. जड,आंधळे, बहिरे, मुके, पिशाच्च किंवा वेड्यासारखे चाळे करीत ते अवधूत बनून इकडे तिकडे भटकू लागले.

तत्र तत्र पुरग्रामाकरखेटवाटखर्वटशिबिरव्रजघोष-

सार्थगिरिवनाश्रमादिष्वनुपथमवनिचरापसदैः(फ्)

परिभूयमानो मक्षिकाभिरिव वनगजस्तर्जनताडना-

वमेहनष्ठीवनग्रावशकृद्रजः(फ्)प्रक्षेपपूतिवातदुरुक्तैस्-

तदविगणयन्नेवासत्सं(म्)स्थान एतस्मिन् देहोपलक्षणे

सदपदेश उभयानुभवस्वरूपेण स्वमहिमावस्थानेना-

समारोपित अहं(म्)ममाभिमानत्वादविखण्डितमनाः(फ्)

पृथिवीमेकचरः(फ्) परिबभ्राम ॥ 30॥

कधी शहरात, कधी खेड्यात, कधी खाणी, शेतकऱ्यांच्या वस्त्या, बागे, डोंगरातील गावे, सेनेच्या छावण्या, गायींचे गोठे, गवळ्यांच्या वस्त्या, यात्रेकरूंच्या धर्मशाळा इत्यादी जागी राहात. कधी डोंगरात, जंगलात किंवा आश्रमात भटकत असत. ते कोणत्याही रस्त्याने चालले तरी वनात फिरणाऱ्या हत्तींना माशा सतावतात, त्याप्रमाणे मूर्ख आणि दुष्ट लोक त्यांच्या पाठोपाठ जाऊन त्यांना त्रास देत असत. कोणी धमकावीत, कोणी मारपीट करीत, कोणी त्यांच्यावर लघवी करीत, कोणी थुंकत, कोणी दगड मारीत, कोणी विष्ठा किंवा धूळ फेकीत, कोणी दुर्गंध सोडीत, कोणी खरे-खोटे बोलून त्यांचा तिरस्कार करीत, परंतु या गोष्टींकडे ते अजिबात लक्ष देत नसत. त्याचे कारण असे होते की भ्रमामुळे सत्य मानल्या गेलेल्या या मिथ्या शरीराविषयी त्यांचे किंचितसुद्धा 'मी-माझेपण' नव्हते. कार्य-कारणरूप अशा संपूर्ण प्रपंचाचे साक्षी होऊन आपल्या परमात्मस्वरूपातच अखंड चित्तवृत्ती ठेवून ते एकटेच पृथ्वीवर विहार करीत होते.

अतिसुकुमारकरचरणोरः(स्)स्थलविपुलबाहुं(म्)सगलवदना-

द्यवयवविन्यासः(फ्) प्रकृतिसुन्दरस्वभावहाससुमुखो

नवनलिनदलायमानशिशिरतारारुणायतनयनरुचिरः(स्)

सदृशसुभगकपोलकर्णकण्ठनासो विगूढस्मितवदन-

महोत्सवेन पुरवनितानां(म्) मनसि कुसुमशरासनमुपदधानः(फ्)

परागवलम्बमानकुटिलजटिलकपिशकेशभूरिभारोऽ-

वधूतमलिननिजशरीरेण ग्रहगृहीत इवादृश्यत ॥ 31॥

तरीसुद्धा त्यांचे हात, पाय, छाती, मोठमोठे बाहू, खांदे, गळा आणि अंगथटी अतिशय कोमल होती. त्यांच्या स्वभावानुसारच त्यांचे सुंदर मुख मधुर हास्याने स्वाभाविकपणे आणखीच सुंदर दिसत होते. त्यांच्या कमलदलांप्रमाणे असलेल्या डोळ्यांत मोठे पाणीदार, विशाल आणि थोडेसे लालसर भाव होते. त्यातील बुबुळे शीतल आणि संताप नाहीसा करणारी होती. त्या डोळ्यांमुळे ते अतिशय सुंदर दिसत होते. गाल, कान, गळा आणि नाक लहान-मोठे नसून समान आणि आकर्षक होते. तसेच त्यांच्या अस्फुट हास्ययुक्त मनोहर मुखकमलाची शोभा पाहून नगरी स्त्रियांच्या चित्तामध्ये कामदेवाचा संचार होत असे. परंतु त्यांच्या तोंडावर जे भुऱ्या रंगाचे लांब-लांब पुष्कळसे कुरळे केस विखुरलेले होते, त्यामुळे आणि बैराग्याप्रमाणे धुळीने माखलेल्या देहामुळे ते पिशाच्चग्रस्त मनुष्यासारखे दिसत होते.

यर्हि वाव स भगवान् लोकमिमं(यँ) योगस्याद्धा

प्रतीपमिवाचक्षाणस्तत्प्रतिक्रियाकर्म बीभत्सितमिति

व्रतमाजगरमास्थितः(श्) शयान एवाश्नाति पिबति

खादत्यवमेहति हदति स्म चेष्टमान उच्चरित आदिग्धोद्देशः ॥ 32॥

योगसाधनेमध्ये हा समाज विघ्नरूप असून किळसवाण्या वेषाने राहणे, हाच यावरील उपाय आहे हे जाणून भगवान ऋषभदेवांनी अजगराची वृत्ती धारण केली. ते पडल्या जागीच खाणे-पिणे, चावणे आणि मल-मूत्र त्याग करीत आणि आपल्या टाकलेल्या त्या मल-मूत्रातच लोळत असत.

तस्य ह यः(फ्) पुरीषसुरभिसौगन्ध्यवायुस्तं(न्) देशं(न्)

दशयोजनं(म्) समन्तात् सुरभिं(ञ्) चकार ॥ 33॥

(परंतु) त्यांच्या मलमूत्राला दुर्गंधी तर नव्हतीच, पण चांगला सुगंध होता. वायू तो सुगंध घेऊन चारही बाजूंच्या दहा योजनेपर्यंतचा सर्व प्रदेश सुगंधित करीत असे.

एवं(ङ्) गोमृगकाकचर्यया व्रजं(म्)स्तिष्ठन्नासीनः(श्) शयानः(ख्)

काकमृगगोचरितः(फ्) पिबति खादत्यवमेहति स्म ॥ 34॥

अशा रीतीने गाय, हरीण, कावळे इत्यादींसारखी वृत्ती स्वीकारून ते त्यांच्याप्रमाणे कधी चालत, कधी उभ्या-उभ्याने, कधी बसून तर कधी झोपूनच खाणे-पिणे आणि मल-मूत्रत्याग करीत असत.

इति नानायोगचर्याचरणो भगवान् कैवल्यपतिर्ऋषभोऽ-

विरतपरममहानन्दानुभव आत्मनि सर्वेषां(म्) भूताना-

मात्मभूते भगवति वासुदेव आत्मनोऽव्यवधाना-

नन्तरोदरभावेन सिद्धसमस्तार्थपरिपूर्णो योगैश्वर्याणि

वैहायसमनोजवान्तर्धानपरकायप्रवेशदूरग्रहणादीनि

यदृच्छयोपगतानि नाञ्जसा नृप हृदयेनाभ्यनन्दत् ॥ 35॥

परीक्षिता, परमहंसांना त्यांच्या आदर्शाची शिकवण देण्यासाठी, भगवान ऋषभदेवांनी अशा प्रकारे अनेक प्रकारच्या योगचर्येचे आचरण केले. ते नेहमी सर्वश्रेष्ठ महान आनंदाचा अनुभव घेत असत. त्यांच्या दृष्टीने निरुपाधिकरूपाने सर्व प्राण्यांचा आत्मा आपल्या आत्मस्वरूप भगवान वासुदेवांशी कोणत्याही प्रकारचा भेद ठेवीत नव्हता. म्हणून त्यांचे सर्व पुरुषार्थ पूर्ण झाले होते. आकाशगमन, मनोवेगाने जाणे, शरीर अंतर्धान पावणे, परकायाप्रवेश, लांबच्या अंतरावरील ऐकणे आणि लांबचे दृश्य पाहणे अशा सर्व प्रकारच्या सिद्धी आपणहून त्यांची सेवा करण्यासाठी त्यांच्याजवळ आल्या, परंतु त्यांनी त्यांचा मनापासून मुळीच स्वीकार केला नाही.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां सं(म्)हितायां(म्)

पञ्चमस्कन्धे ऋषभदेवानुचरिते पञ्चमोऽध्यायः ॥